File No.SMC-11011(14)/4/2022-SMC-GAD

सोलापूर महानगरपालिका

जा.क्र.नआ/वै/ 275
आयुक्तांचे कार्यालय.
दि. 13 जूलै 2022

## : कार्यालयीन आदेश :

**विषय- Qfield App चा वापर करणेबाबत..**

उक्त विषयास अनुसरुन मनपाच्या विविध विभागामार्फत रस्ते, ड्रेनेज, पाणीपुरवठा, दिवाबत्ती इ. अशा नवीन प्रस्तावित करावयाच्या कामांसाठी व तसेच चालू कामांसाठीच्या अदा होणा-या बिलांसाठी जीओ टॅगींग असणे बंधनकारक करण्यात आले आहे. यासाठीची प्रणाली उपरोक्त नमूद Qfield App मध्ये सोप्या पध्दतीने असल्याने, रेकॉर्ड ठेवणे सोयीचे जाणार असल्याची बाब निदर्शनास आली आहे. सदर ॲपसंदर्भात सर्व अवेक्षक/सहाय्यक अभियंता/नियंत्रण अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. ही बाब लक्षात घेता, खालीलप्रमाणे आदेशित करण्यात येत आहे.

1) यापूढे नवीन प्रस्तावित होणा-या कामांसाठी Qfield App- ॲपचा वापर करुन, जीओ टॅग/मॅपींग नोंद सदर ॲपमध्ये करणे याद्वारे बंधनकारक करण्यात येत आहे.
2) कोणत्याही प्रस्तावित अथवा सध्याच्या चालू असलेल्या कामांसाठी जीओ टॅगींग सदर ॲपच्या माध्यमातून करण्यात यावे.
3) मुख्य लेखापाल कार्यालयाकडून सदर ॲपमध्ये नोंद असल्याची खात्री करुनच प्रस्तावित/चालू कामांसाठी बजेट अभिप्राय देण्याची कार्यवाही ठेवावी.
4) देखभाल दुरुस्ती कामांसाठी सदर ॲप माध्यमातून नोंद ठेवणे आवश्यक राहील.
5) नवीन प्रस्तावित कामांसाठी व चालू कामांसाठीच्या अदा केल्या जाणा-या सर्व बिलांसाठी सदर ॲपमध्ये नोंद असल्याची खात्री करुनच नियंत्रण अधिकारी, लेखापरीक्षण व मुख्यलेखापाल कार्यालयाकडून बिल अदायगी करण्यासंदर्भात पुढील कार्यवाही ठेवणे बंधनकारक करण्यात येत आहे.
6) उपरोक्तप्रमाणे Qfield App संदर्भात दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी जाणूनबूजून न करणे अथवा दुर्लक्षित केल्याची बाब निदर्शनास आल्यास, संबंधितांविरुध्द नाईलाजास्तव कारवाई करावी लागेल, याची नोंद घ्यावी.

Signed by P sivasankar
Date: 13-07-2022 18:34:09
Reason: Approved

( पी.शिवशंकर, भाप्रसे )
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका.

प्रति,
सर्व खातेप्रमुख/नियंत्रण अधिकारी
प्रत- सर्व संबंधित - विभागीय अधिकारी 1 ते 8